महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

दु. क्र. (का.) २६४७४२११, २६४७२१३१
(वै.) २६४७८२५२
फॅक्स : ०२२.२६४७२९३७

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशा रोड,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

Email : cedist@mahadiscom.in

---

**क्र. मु.अ.(वितरण) / डी-३/परिपत्रक/२५६८०** **दिनांक : १९.०६.२००८**

## परिपत्रक

**विषय :- राज्यातील निरनिराळया भागांच्या विद्युतीकरणासाठी योजना आखणे, तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणे आणि नवीन विद्युत जोडण्या देणे, यासाठीची कार्यपध्दती.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मु.अ.(वितरण)/डी-३/२२१९७, दि.२०.०५.२००८.**

संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने आणि विद्युत अधिनियम, २००३ यातील कलम ४३ अन्वये सार्वत्रिक वीज पुरवठयाची बांधिलकी पार पाडण्यासाठी व त्याच अधिनियमाचे कलम ४६ अनुसार आकार वसुली करण्यासाठी; तसेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग {विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या शर्ती}विनियम यानुसार आणि क्र.७०/२००५ या प्रकरणी आयोगाने दि.८ सप्टेंबर २००६ रोजी दिलेला आदेश (आकार अनुसूची) यांचे अनुपालन करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

१) ग्राहकांच्या मोठया समुहास निम्न दाब वीज जोडण्या शक्य तेवढया कमी वेळात देण्याकरीता, ग्राहकांच्या मागणी अर्जांना महावितरण कंपनीकडून अ, ब आणि क विभागानुसार त्याच क्रमाने प्राथम्य देण्यात येईल. दारिद्रय रेषेखालील ग्राहक, दुर्बल घटक आणि अद्याप विद्युतीकरण न झालेल्या दुर्गम भागांतील ग्राहक यांच्याकरीता कंपनी विशेष योजनांद्वारे प्रथम पायाभूत सोई विकसित करील आणि वीज जोडण्या देईल.

**२) मुख्य अभियंते आणि त्यांचे क्षेत्रिय अधिकारी आपल्या अधिपत्याखालील विभागात होत असलेल्या विकास कामांचा नियमितपणे व प्रति- सक्रियतेने आढावा घेतील आणि तेथील ग्राहकांना वीज जोडण्या देण्याकरीता प्रथम पायाभूत सोई निर्माण करण्याच्या योजना आखून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतील. त्यानंतर वित्तीय संस्थाकडून अर्थसहाय्य मिळवतील आणि कामांची योग्य क्रमाने मांडणी करतील, (उचित प्रकरणी, नॉन -टर्न की कंत्राटदाराकडून काम करुन घ्यावयाचे असेल तर ) तसे कंत्राटाची नेमणूक व सामग्री अंमलबजावणीसाठी तयार ठेवतील. संभाव्य**

**ग्राहकांनी मागणी केल्याबरोबर सदर योजनांची अंमलबजावणी करण्यात येऊन वीज जोडण्या देण्यात याव्यात. जेथे शीघ्र गतीने व संकेंद्रीत पध्दतीने मोठया प्रमाणात विकसन चालू असेल अशा परिसरांत, तेथील क्षेत्रिय अधिकारी लगतची भावी मागणी पूर्ण करण्यासाठी उपकेंद्र स्थापना / क्षमतावाढ यासारख्या आवश्यक पायाभूत सोईंची प्रति सक्रिय आखणी करतील व त्यांची निर्मिती करतील.**

३) पूर्वोक्त परिच्छेदातील व्याख्येप्रमाणे प्राथम्यक्रम द्यावयाच्या प्रभागातील प्रलंबित अर्जाची कालक्रमानुसार व प्रवर्गनिहाय यादी तयार ठेवण्यात येईल. एखाद्या ग्राहकास किंवा ग्राहक समुहास प्राथम्यक्रम सोडून अगक्रमाने वीज जोडणी पाहिजे असल्यास त्याने महावितरण कंपनीच्या देखरेखीखाली स्वखर्चाने काम करुन घ्यावे व त्या खर्चाचा वीज देयकाद्वारे परतावा मिळवावा. तथापि, अशा ग्राहकांनी समुचित प्राधिका-यांनी मंजूर केलेले खर्च अंदाज आणि विनिर्देश प्राप्त केले पाहिजेत. तसेच; त्यांनी महावितरण कंपनीला पर्यवेक्षण आकार देण्याची आवश्यकता असणार नाही.

४) वीज पुरवठयाची मागणी करणा-या अर्जांचा प्राथम्यक्रम सविस्तर प्रकल्प अहवालात दाखवण्यात यावा.

५) एकल तारमार्गांचे रेखाटन; त्यासाठीचे खर्च - अंदाजपत्रक व तपशीलवार यासह प्रकल्प अहवाल असावेत.

६) मंडलनिहाय / विभागनिहाय तपशीलवार प्रकल्प अहवाल / खर्च -अंदाज हे खर्चाची अदयावत आधारसामग्री व उचित वरकड खर्च धरुन तयार करावेत. तपशीलवार प्रकल्प अहवाल नित्याच्या आरइसी/पी/आयई नमुन्यात तयार करुन ते मुख्य कार्यालयास सादर करावेत.

७) उच्चदाब - निम्न दाब गुणोत्तर १:१ असे राखण्यात यावे.

८) वितरण परिवर्तित्रावरील वीज भार ७० % एवढाच ठेवण्यात यावा, त्याहून अधिक असु नये. तसे झाल्यास पुरवठा प्रणालीतील अनावश्याधिक्यात (redundancy) वाढ होईल.

९) सर्वसाधारणपणे १००० कृषीपंप वीजभाराकरीता किमान तीन आऊटलेट असणारे ३३/११ केव्ही नवीन उपकेंद्र प्रस्तावित करण्यात यावे.

१०) ११ के.व्ही वाहिनी (फिडर) करीता ग्रामीण भागांत प्रलंबित कॉक्रीट खांबावर किमान ५० चौ.मि.मी.चे संवाहक टाकण्यात यावेत आणि शहर भागात आर एस जॉइटसहित १०० चौ. मि. मी.चे संवाहक टाकण्यात यावेत. शहर भागासाठी खर्च- अंदाज तयार करताना भावी काळातील भार-मागणी पूर्ण करण्याची तयारी ठेवून, आधार खांबावर संवाहकांचे द्विपरिपथ बांधण्याची अथवा अन्यत्र किमान दोन इनकमर्स असणारे स्वीचन केंद्र स्थापन करण्याची तरतूद करुन ठेवावी.

११) संवाहकामधून त्याच्या निर्धारित क्षमतेहून केव्हाही अधिक भार होणार नाही असे पहावे.

१२) उपकेंद्राच्या खर्च अंदाजात उचित क्षमतेच्या धारित्रांचा (कॅपॅसिटर्सचा) खर्च अवश्य समाविष्ट करावा.

१३) शहरी; तसेच ग्रामीण भागांतील प्रत्येक ११ केव्ही फीडरवर प्रतिक्रिय शक्तीच्या कार्यक्षम व्यवस्थापनाकरिता ०.६ एमव्हीएआर क्षमतेची चालू स्थितीतील (ऑन-लाईन) धरित्रे कॅपॅसिटर्स लावण्यात यावीत. यामुळे, भाराची रुपरेखा सुधारण्यास, तांत्रिक हानी व तार-मार्गांवरील अतिभार कमी होण्यास मदत होईल.

१४)उपकेंद्रातील आणि तारमार्गांवरील सर्व कट पॉइंटस, जंपर्स यासोबत क्रीपिंग/वेज कनेक्टर्स असले पाहिजेत.

१५)किनारी प्रदेशात एमएस संरचनेऐवजी जी आय संरचना, धुकेविरोधी निरोधक (इन्सुलेटर्स) विशेषत : पीव्हीसी स्ट्रींग टाइप इन्सुलेटर्स बसवण्यात यावेत.

१६) मंजुर करावयाच्या खर्च-अंदाजास पुढीलप्रमाणे क्रमांक देण्यात यावेत :-

एक) काअ/विभाग/टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ/०८-०९/....दिनांक,(नोंदवही-१)**:-**म.वि. नियामक आयोगाचा ८ सप्टेंबर २००६ चा आदेश (आकार अनुसूची ) यानुसार ग्राहकाकडून / ग्राहकांकडून केवळ आकार वसुली

दोन) काअ/विभाग/टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ/सीसी ॲन्ड आरएफ /०८-०९ / .... दिनांक , (नोंदवही -२) : मध्ये पायाभूत सोईच्या खर्चाखेरीज वरील (एक) यातील, आयोगाच्या दि.८ सप्टेंबर २००६ च्या आदेशा प्रमाणे वसूल करावयाचे (ना -परतावा) आकार.

तीन) काअ/विभाग/टेक/डीडीएफ/०८-०९/....दिनांक, (नोंदवही-३) : मध्ये ग्राहकांकडून एकूण पायाभूत सोईच्या खर्चाची वसुली.

खर्च-अंदाज मंजुरीच्या नोंदवहया वर नमूद केल्याप्रमाणे ठेवण्यात याव्यात.

**<u>मंडल कार्यालयातील नोंदवहया</u>**

एक) एसई/सर्क ल/टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ/०८-०९/....दिनांक ,(नोंदवही -१ ): आयोगाच्या ८ सप्टेंबर २००६ चा आदेश (आकार अनुसूची) यानुसार ग्राहकाकडून / ग्राहकांकडून केवळ आकार वसुली.

दोन) एसई/ सर्क ल /टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ,सीसी ॲन्ड आरएफ०८-०९/ ....दिनांक ,(नोंदवही -२ ): आयोगाचा ८ सप्टेंबर २००६ चा आदेश (आकार अनुसूची ) यानुसार ग्राहकाकडून / ग्राहकांकडून पायाभूत सोईचा खर्चाखेरीज ग्राहकाकडून / ग्राहकांकडून केवळ आकार यांची वसुली.

तीन) एसई/ सर्क ल /टेक/डीडीएफ/ ०८-०९/ ....दिनांक ,(नोंदवही -३ ): ग्राहकांकडुन पायाभूत सोईच्या एकूण खर्चाची वसुली.

**परिमंडल कार्यालयात :**

एक) सीई/झोन/टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ/०८-०९/...दिनांक,(नोंदवही-):आयोगाच्या ८ सप्टेंबर २००६ चा आदेश (आकार अनुसूची) यानुसार ग्राहकाकडून / ग्राहकां - कडून केवळ आकार वसुली

दोन) सीई/झोन/टेक/अेआरआर/नॉन-डीडीएफ,सीसी ॲण्ड आरएफ /०८-०९ / ....दिनांक (नोंद- वही -२ ): आयोगाचा ८ सप्टेंबर २००६ चा आदेश (आकार अनुसूची )यानुसार ग्राहकाकडून / ग्राहकांकडून पायाभूत सोईचा खर्च वगळता ना परतावा तत्वावर आकार वसुली.

तीन) सीई/झोन/टेक/डीडीएफ/०८-०९/....दिनांक , (नोंदवही -३ ): ग्राहकांकडुन पायाभूत सोईंच्या एकूण खर्चाची वसुली.

**स्पष्टीकरण :** DDF ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा.
ARR वार्षिक महसुलाची आवश्यकता
CC&RF ग्राहकाने केलेला खर्च व त्याचा वीज देयकाद्वारे परतावा.

१७) Non-DDF म्हणजे, ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा नव्हे परंतु ग्राहकाने वीजपुरवठया-करीता आरंभीचे काम स्वखर्चाने करुन घ्यावयाची तयारी आणि वीज देयकाद्वारे त्या खर्चाचा परतावा मिळावा अशी प्रकरणे.

१८) अशा खर्चाचे अंदाज, विभाग / मंडल /परिमंडल पातळीवर स.आ.दोन अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांनुसार तांत्रिक दृष्टया मंजूर करुन द्यावयाचे आहेत.

१९) आयोगाकडे कंपनीच्या वार्षिक महसूली आवश्यकतेकरिता याचिका सादर करतेवेळी लागणारी महत्वाची माहिती म्हणून अशा मंजुरी दिलेल्या खर्च अंदाजाचे तपशिल लिहिलेली स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल.

२०) तपशीलवार प्रकल्प अहवाल; त्यावर पुढील कार्यवाही करण्यासाठी, सक्षम प्राधिका-यांची प्रशासनिक मान्यता घेण्यासाठी आणि प्रकल्पावर गुंतवणूक करण्यास आयोगाची तत्वतः मान्यता मिळविण्यासाठी सांघिक कार्यालयास अग्रेषित करण्यात यावेत.

२१) वर नमूद केलेल्या मान्यता प्राप्त झाल्यानंतर, असे तपशीलवार प्रकल्प अहवाल अर्थ-सहाय्याच्या मागणीकरीता वित्तीय संस्थांना सादर करण्यात येतील.

२२) सर्व औपचारिकता पूर्ण करणा-या अर्जदारांना वीज पुरवठा देण्याकरीता त्या कामाचे वार्षिक कंत्राट देण्याची आवश्यकता असेल. संचमांडणीच्या कामात वापरावयाचे साहित्यसामग्री; कामाची गुणवत्ता सांभाळण्यासाठी, महावितरण कंपनीच्या विनिर्देशांप्रमाणेच असेल.

२३) शासनाने अधिसुचित केलेल्या अनुशेष जिल्हयांतील, त्याचप्रमाणे ना-अनुशेष जिल्हयातील कृषीपंपाना वीज पुरवठा करण्याबाबतचा अनुशेष; निःशेष करावयाचा आहे. याच्या निव्वळ परिणाम म्हणजे कृषी ग्राहकांनी मागणी करताच त्यांना वीज पुरवठा करणे असे राहील.

२४) वरील मुद्दे विचारात घेवून, महावितरण कंपनी संभाव्य ग्राहकांची मागणी पूर्ण करण्याच्या सुस्थितीत असावी म्हणून क्षेत्रिय अधिका-यांनी प्रतिसक्रिय होऊन प्रारंभ करावा.

२५) सर्व माहिती (एमएस एक्सेलमध्ये) उपलब्ध करुन देण्यात यावी आणि नियमितपणे अद्यावत करण्यात यावी आणि वार्षिक महसुली आवश्यकतेच्या उद्देशाने सांघिक कार्यालयास दर तीन महिन्यांनी सादर करावी.

मुख्य अभियंता (वितरण)

**प्रत सादर :-**

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.लि., मुंबई.
२) संचालक (संचलन), म.रा.वि.वि.कं.लि., मुंबई.
३) संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं.लि., मुंबई.
४) संचालक (दक्षता व सुरक्षा),म.रा.वि.वि.कं.लि., मुंबई.
५) कार्यकारी संचालक : सांघिक नियोजन - १ /२/ ३ आणि मानव संसाधन, म.रा.वि.वि.कं.लि., मुंबई.

**प्रत सादर अग्रेषित :**

१) सर्व मुख्य अभियंते : वाणिज्य / वीज खरेदी /अंतर्गत सुधारणा/भारव्यवस्थापन/वितरण विशेष प्रकल्प /स्वयंचालित मीटरवाचन / गतिमान वीज विकास व सुधारण प्रकल्प /भांडार/मुख्य सल्लागार, वितरण फेंचाइसी / अधीक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष)
२) मुख्य महाव्यवस्थापक : वित्त व लेखा / अंतर्गत लेखापरीक्षा /तांत्रिक आस्थापना
मुख्य सल्लागार (विधी),
महाव्यवस्थापक (वित्त-कॅप)/सांघिक लेखा
३) मुख्य महाव्यवस्थापक -(माहिती तंत्रज्ञान)
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या वेबसाईटवर दाखल करावे.
४) सर्व मुख्य अभियंते (सं व सु.) परिमंडळे

**प्रत रवाना :**

१) सर्व अधीक्षक अभियंते (सं व सु.) मंडळे
२) सर्व कार्यकारी अभियंते
३) सर्व उपविभागीय कार्यालये